MHPU250025012021

## फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ५६३/२०२१ मधील नि.क्र. ५ वरील आदेश

१) अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ मधील कलम २३ प्रमाणे जाबदेणार क्र. १ याचेकडून दरमहा र.रु. १०,०००/– इतका अंतरिम पोटगीचा हुकूम होउन मिळणेकरीता दाखल केलेला आहे. अर्जदाराचा मुळ अर्ज प्रलंबित आहे.

**अर्जदार हिचे अर्जातील कथन असे की,**

२) अर्जदार व जाबदेणार क्र. १ हे पती–पत्नी असून त्यांचा विवाह दि. २१/०५/२०२१ रोजी मौजे नेतवड, ता. जुन्नर, जि. पुणे येथे झाला. अर्जदार हिचे लग्नात तिचे आईवडिलांनी दोन्ही बाजूंचा मानपान, संसारोपयोगी भेटवस्तू व सोन्याचे दागदागिने देउन लग्न मोठया थाटामाटात करुन दिले. लग्नानंतर अर्जदार ही तिचे सासरी नांदावयास गेली. जाबदेणार क्र. २ व ३ हे अर्जदाराचे सासरे व सासू असून, जाबदेणार क्र. ४ व ५ हे दीर व जाउ आहेत. लग्नानंतरचे काही दिवस जाबदेणार यांनी अर्जदारास कसेबसे नांदवले. त्यानंतर जाबदेणार क्र. १ याने अर्जदारास नोकरीकरीता तिचे शैक्षणिक कागदपत्रे माहेरुन आणणेस सांगितले. त्यानंतर अर्जदार ही पहिली बोळवण करुन पुन्हा सासरी आलेनंतर जाबदेणार क्र. १ याने अर्जदाराचे शैक्षणिक कागदपत्रे स्वतःजवळ ठेउन घेतली. त्यानंतर जाबदेणार यांनी अर्जदाराकडे पैशांची मागणी करुन, स्वयंपाक करता येत नाही तसेच घरातील कामे रात्री उशीरापर्यंत करणेस सांगणे, शेतातील कामे करणेस सांगून तिचा जाचहाट करणेस सुरुवात केली. जाबदेणार क्र. २ ते ५ हे जाबदेणार क्र. १ यास चिथावणी देत होते.

३) पुढे अर्जदार हिचे अर्जातील कथनानुसार, अर्जदार ही जाबदेणार यांचा सर्व शारीरिक छळ सहन करुन सासरी नांदत होती. जाबदेणार यांच्या छळामुळे अर्जदार हिचे तब्येतीवर परिणाम झाला. त्यावेळी जाबदेणार क्र. १ याने अर्जदारास वैदयकिय उपचाराच्या खर्चाकरीता पैसे दिले नाही. त्यामुळे अर्जदार हिची तब्येत अधिकच खालावू लागल्याने तिने तिचे वडिलांना बोलावून घेउन त्यांचेसह माहेरी आली. त्यानंतर तिचे वडिलांनी जाबदेणार यांना बोलावून घेतले. त्यावेळी जाबदेणार यांनी अर्जदारास नांदवणेस नकार दिला व तिचे शैक्षणिक कागदपत्रे परत देणार नाही असे म्हणून शिवीगाळ व दमदाटी केली.

४) पुढे अर्जदार हिचे अर्जातील कथनानुसार, अर्जदार ही सध्या तिचे माहेरी राहत असून, तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. याउलट जाबदेणार क्र. १ हा इलेक्ट्रीशियन असून, बनकरफाटा, ता. जुन्नर येथे दोन गाळे आहेत. सदर व्यवसायापासून जाबदेणार क्र. १ यास दरमहा र.रु. २५ ते ३० हजार उत्पन्न मिळते. त्याचप्रमाणे जाबदेणार यांची मौजे नेतवड, ता. जुन्नर येथे शेतजमीन असून, त्यापासून वार्षिक र.रु. २० ते ३० लाख उत्पन्न मिळते. अशा प्रकारे अर्जदार हिने जाबदेणार क्र. १ यास चांगले उत्पन्न मिळत असल्याचे कथन केले. जाबदेणार क्र. १ याचे उत्पन्नावर अर्जदाराशिवाय कोणीही अवलंबून नसून अर्जदाराने अर्जात नमूद केलेप्रमाणे दरमहा र.रु. १०,०००/– इतका अंतरिम पोटगीचा हुकूम होउन मिळावा अशी विनंती केली.

५) सदर अर्जाचे कामी जाबदेणार क्र. १ ते ५ यांनी हजर होउन मुळ अर्जास तसेच अर्जदाराच्या अंतरिम पोटगीचे अर्जास नि.क्र. १५ वर लेखी म्हणणे दाखल केले. जाबदेणार यांनी अर्जदार व जाबदेणार यांचेतील नातेसंबंध मान्य केलेले असून अर्जदाराचे मुळ व सदरील अर्जातील सर्व तक्रारी नाकारलेल्या आहेत. जाबदेणार याचे म्हणणेतील कथनानुसार, अर्जदार व जाबदेणार क्र. १ यांचा विवाह एकमेकांच्या संमतीने झालेला आहे. जाबदेणार यांनी लग्नाचा संपूर्ण

खर्च केलेला असून लग्नामध्ये अर्जदार हिस सोन्याचांदीचे दागिने घातलेले आहे. लग्नानंतर अर्जदार ही अंदाजे २७ दिवस सासरी राहिलेली आहे. अर्जदार हिस लग्नापूर्वीपासून पाठदुखीचा आजार असून सदरची बाब अर्जदाराचे माहेरील लोकांनी लपवून ठेउन जाबदेणार क्र. १ सोबत लग्न करुन दिले. अर्जदार ही तिचे सासरी नांदत असतांना घरामध्ये कोणतीही कामे न करता झोपून राहणे, घरातील लोकांशी अबोला धरणे, वेगवेगळी गोळया–औषधे घेणे असे प्रकार करत होती. अर्जदार हिच्या आजारपणाबाबत जाबदेणार क्र. १ याने तिच्याकडे विचारणा केली असता, पूर्वी मोटारसायकलवरुन पडल्याने त्रास जाणवत असल्याचे खोटे सांगितले. अर्जदार हिने कधीही जाबदेणार क्र. १ यास वैवाहीक सुख दिलेले नाही.

६) पुढे जाबदेणार यांचे म्हणणेतील कथनानुसार, दि. ८/७/२०२१ रोजी जाबदेणार क्र. ४ यांनी अर्जदार हिस माहेरी सोडले. त्यावेळी अर्जदार हिने सोन्याचांदीचे दागिने, कपडेलत्ते व मोबाईल फोन घेउन गेली. काही दिवसानंतर जाबदेणार क्र. १ हा अर्जदार हिस आणणेसाठी तिचे माहेरी गेला असता अर्जदार हिचे आईवडिलांनी अर्जदारास नांदणेकरीता पाठविणेस नकार दिला. त्यानंतर दि. १९/७/२०२१ रोजी अर्जदार हिस पाठीचा त्रास जास्त होत असलेबाबत जाबदेणार क्र. १ यास समजल्याने त्याने अर्जदार हिस ओतूर येथील दवाखान्यात नेले. तेथे उपचार घेतलेनंतर अर्जदार ही परस्पर माहेरी निघून गेली. त्यानंतर जाबदेणार क्र. १ याने अर्जदार हिचेशी संपर्क साधणेचा प्रयत्न केला. परंतू अर्जदार ही जाबदेणार क्र. १ याचेशी संपर्क टाळू लागली.

७) पुढे जाबदेणार यांचे म्हणणेतील कथनानुसार, त्यामुळे जाबदेणार क्र. १ याने महिला समुपदेशन केंद्र, जुन्नर येथे अर्ज केला. त्यानुसार अर्जदार ही दि. २७/९/२०२१ रोजी हजर होउन जाबदेणार यांना चार महिन्यांनी नांदणेस येणार असल्याचे सांगितले. त्यावेळी अर्जदार हिस व्यवस्थीत उठताबसता येत

नव्हते. त्यावेळी जाबदेणार क्र. १ याने अर्जदाराकडे वैदयकिय उपचार घेतलेबाबत कागदपत्रांची मागणी केली असता अर्जदार हिने देखील तिचे शैक्षणिक कागदपत्रे मागणी केली. त्यावेळी जाबदेणार याने अर्जदार हिस तिचे सर्व शैक्षणिक कागदपत्रे परत दिलेली आहेत. त्यानंतर जाबदेणार क्र. १ व २ यांनी अर्जदारास फोन करुन संपर्क साधणेचा प्रयत्न केला. परंतू अर्जदार हिने योग्य प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे जाबदेणार क्र. १ याने दि. ११/११/२०२१ रोजी वकिलांमार्फत अर्जदारास नोटीस पाठवली असता अर्जदार हिने खोटया मजकूराचे नोटीसीस उत्तर पाठवले.

८) पुढे जाबदेणार यांचे म्हणणेतील कथनानुसार, अर्जदार हिस लग्नापूर्वी पासून पाठदुखीचा आजार असून सदरची बाब लपवून ठेउन जाबदेणार क्र. १ यास फसवून लग्न केलेले आहे. अर्जदार हिने नांदावयास येणेकरीता जाबदेणार यांनी मध्यस्थांमार्फत अनेक प्रयत्न केलेले आहेत. अर्जदार ही स्वतःहून जाबदेणार क्र. १ याचा त्याग करुन माहेरी राहत आहे. जाबदेणार याचे असणारे दुकान कोरोना महामारीमुळे बंद करावे लागलेले आहे. जाबदेणार क्र. १ हा कोणताही कामधंदा करत नसून त्यास उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. अर्जदाराचे बी.कॉम. पर्यंत शिक्षण झालेले असून, तिला पोलीस सेवेत भरती होणेकरीता जाबदेणार यांनी अनेक प्रयत्न केलेले आहेत. जाबदेणार यांनी अर्जदाराचा कधीही कोणताही छळ केलेला नाही. त्यामुळे अर्जदाराने अर्जात नमूद केलेली अंतरिम पोटगी रक्कम देणेची जाबदेणार क्र. १ याची आर्थिक परिस्थिती नसल्याने अर्जदाराचा अंतरिम पोटगीचा अर्ज खर्चासह नामंजूर करावा अशी विनंती केली.

९) अर्जदारातर्फे युक्तीवाद ऐकला. अर्जदारातर्फे युक्तीवादादरम्यान असे कथन करणेत आले की, अर्जदार व जाबदेणार क्र.१ हे पती–पत्नी असून त्यांचेतील नातेसंबंध अदयाप कायम आहेत. अर्जदार हिस लग्नानंतर जाबदेणार यांनी केलेल्या शारीरिक व मानसिक छळामुळे पाठीचा आजार सुरु होउन अपंगत्व

आलेले आहे. त्यासंदर्भाने अर्जदार हिने अर्जाचे कामी वैदयकिय कागदपत्रे पटलावर दाखल केलेली आहेत. जाबदेणार क्र. १ याचा इलेक्ट्रीशियनचा कोर्स झालेला असून, जाबदेणार क्र. १ याने त्याचे नि.क्र. १५ वरील म्हणणेमध्ये दुकान असल्याचे मान्य केलेले आहे. जाबदेणार क्र. १ याचा शेती व्यवसाय असून सदर व्यवसायापासून त्यास चांगले उत्पन्न मिळते. जाबदेणार क्र. १ याचे उत्पन्नावर अर्जदाराशिवाय इतर कोणीही अवलंबून नाहीत. अर्जदार हिचे माहेरची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. जाबदेणार क्र. १ याने स्वतःहून अर्जदाराचा त्याग केलेला आहे. त्यामुळे अर्जदार हिने जाबदेणार क्र. १ कडून दरमहा र.रु. १०,०००/– इतका अंतरिम पोटगीचा हुकूम होउन मिळावा अशी विनंती केली.

१०) जाबदेणार तर्फे युक्तीवादादरम्यान, जाबदेणार यांची वडिलोपार्जित शेतजमीन असून, जाबदेणार यांचे नांवे अत्यल्प भुक्षेत्र आहे. अर्जदार हिने दाखल केलेले दुकानाचे फोटो हे जाबदेणार क्र. १ याचे मालकीचे दुकान असलेबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. जाबदेणार यांनी अर्जदारास कोणताही जाचहाट केलेला नाही. अर्जदार हिस पूर्वीपासून पाठीचा आजार आहे. अर्जदार हिने जाबदेणार यांना त्रास देण्याचे हेतूने सदरचा अर्ज दाखल केला आहे. अर्जदार ही बी.कॉम. पदवीधर आहे. जाबदेणार क्र. १ याची अर्जदारास नांदवणेस तयार आहे. जाबदेणार क्र. १ यास उत्पन्नाचे कोणतेही साधन नसून त्याची अर्जदार हिस पोटगी देण्याची ऐपत नाही. त्यामुळे अर्जदाराचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली.

११) दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. याकामी अर्जदार तसेच जाबदेणार यांचेतर्फे दाखल केलेला कागदोपत्री पुरावा पाहिला.

१२) अर्जदाराने सदर अर्जातील कथनाच्या पृष्टयर्थ शपथपत्र दाखल केले आहे. हे खरे आहे की, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करणारा

कायदा कलम २३ प्रमाणे अंतरिम आदेश करता येतो. अर्जदारावर कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे अर्जदार हिने मुळ अर्ज व प्रस्तुतचे अंतरिम अर्जात कथन केलेले आहे. जाबदेणार क्र. १ तर्फे सदरचे कौटुंबिक हिंसाचाराबाबतची कथने नाकारलेली आहेत. अर्जदार हिने अर्जात नमूद केलेल्या घटना, तक्रारी व त्यास जाबदेणार मार्फत नाकारलेची बाब दोन्ही बाजूंचा पुरावा विचाराधीन घेउन गुणदोषांवर निर्गत करता येईल. तसेच जाबदेणार क्र. १ याने जरी अर्जदारास नांदणेस येणेसाठी स्वतः तसेच मध्यस्थांमार्फत अनेक प्रयत्न केले परंतू अर्जदाराने नांदणेस येण्यास स्पष्ट नकार दिला असून ती स्वच्छेने माहेरी राहत आहे असे कथन केलेले असले तरी अर्जदाराने स्वतः जाबदेणार क्र. १ याचा त्याग केला किंवा कसे ही बाब देखील दोन्ही बाजूंचा पुरावा घेउन गुणवत्तेवर ठरविणे आवश्यक आहे. परंतू सकृतर्शनी अर्जदार ही जाबदेणार क्र. १ पासून स्वतंत्र राहत असल्याचे स्पष्ट होते.

**१३)** अर्जदारामार्फत नि.क्र. ३ चे कागदयादी सोबत मौजे नेतवड, ता. जुन्नर येथील गट नं. ४, १३८, १९४, २२०, २२४, ७० येथील ७/१२ उतारे, जाबदेणार यांचे मालकीचा गाळा असलेबाबतचा फोटो इ. कागदपत्रे याकामी सादर केलेली आहेत. जाबदेणार यांचेतर्फे नि.क्र. १७ चे कागदयादी सोबत अर्जदार व जाबदेणार क्र. १ यांचे विवाहाची लग्नपत्रिका, जाबदेणार यांनी लग्नाकरीता दागदागिने खरेदीवर खर्च केलेबाबत एकूण ११ बिल पावत्या, अर्जदार हिचे वैदयकिय उपचाराची कागदपत्रे, महिला समुपदेशन केंद्र, जुन्नर यांचेकडील दि. ११/१/२०२२ रोजी जाबदेणार क्र. १ यास दिलेले पत्र, जाबदेणार क्र. १ याने दि. ११/११/२०२१ रोजी अर्जदारास पाठविलेली नोटीस व त्यास अर्जदाराने दि. २४/११/२०२१ रोजी दिलेले उत्तर, मौजे कुसूर, ता. जुन्नर येथील गट नं. ४२०, ३४७ चे ७/१२ उतारे इ. कागदपत्रे दाखल केलेले आहेत.

**१४)** सदरकामी अर्जदारतर्फे दाखल केलेला कागदोपत्री पुरावा पाहता, अर्जदार व जाबदेणार क्र. १ यांचे दरम्यान असणा–या तक्रारींचे स्वरुप प्रथमदर्शनी दिसून येते. मात्र अर्जदार हिने दाखल केलेले मौजे नेतवड येथील गट नं. ४, १३८, १९४, २२०, २२४, ७० चे ७/१२ उतारे पाहता, त्यामध्ये जाबदेणार क्र. २ चे नांवे ठराविक क्षेत्र नोंद असल्याचे दिसून येते. मात्र याठिकाणी अर्जदार तर्फे जाबदेणार क्र. १ याचे नांवे बनकरफाटा, जुन्नर येथे गाळे असून, त्यातून जाबदेणार क्र. १ यास उत्पन्न मिळत असलेबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा सदरकामी दाखल केलेला नाही. तसेच जाबदेणार क्र. १ याचा इलेक्ट्रीशियनचा कोर्स झाला असून, त्याला शेतीतून वार्षिक २० ते ३० लाख रुपये उत्पन्न मिळते याबाबत देखील स्वतंत्र कागदोपत्री पुरावा सादर केल्याचे दिसून येत नाही. जाबदेणार क्र. १ तर्फे त्याचे म्हणणेमध्ये जरी अर्जदार ही तिचे बी.कॉम.पर्यंत शिक्षण झाले असल्याचे नमूद करुन ती कमवती असल्याचे कथन केले असले तरी त्या अनुषंगाने देखील कोणताही कागदोपत्री पुरावा याकामी सादर केलेला नाही.

**१५)** अर्जदारतर्फे नि.क्र. १८ वर मालमत्ता व देयकाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले असून, सदर प्रतिज्ञापत्राचे अवलोकन करता, अर्जदाराचा सर्वसाधारण मासिक खर्च या कलम ७ मधील रकान्यात र.रु. १५,०००/– खर्च असा नमूद केला असला तरी त्याचा खुलासेवार तपशील मांडलेला नाही. अर्जदार हिने सदरील प्रतिज्ञापत्रात पान क्र. ७ वर केवळ जाबदेणार क्र. १ हा कमवता असलेबाबत उल्लेख केला असून त्याचे निश्चित उत्पन्न नमूद केलेले नाही.

**१६)** जाबदेणार क्र. १ तर्फे नि.क्र. ३५ वर मालमत्ता व देयकाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले असून सदर प्रतिज्ञापत्राचे अवलोकन करता, तो दहावी पास असून, त्याचेवर आईवडिलांची जबाबदारी असल्याचे नमूद केले आहे. जाबदेणार क्र. १ याने सदर प्रतिज्ञापत्रात त्याचे मासिक उत्पन्न र.रु. ४,०००/– इतके नमूद

केलेले असून, अर्जदाराने नि.क्र. ३ चे कागदयादी सोबत दाखल केलेले फोटोतील दुकान सध्या बंद अवस्थेत असल्याचे नमूद केलेले आहे.

१७) याठिकाणी अर्जदार ही जाबदेणार क्र. १ पासून विभक्त राहत असल्याचे कोठेही नाकारलेले नसून तिचे उदरनिर्वाहाकरीता जाबदेणार क्र. १ हा आर्थिक स्वरुपात तरतूद करत असल्याचे जाबदेणार यांनी तोंडी अथवा कागदोपत्री पुराव्याद्वारे शाबीत केलेले नाही. त्यामुळे अर्जदार हिचे उदरनिर्वाहाची आवश्यक ती काळजी जाबदेणार क्र. १ घेत नसल्याचे अर्जदार तर्फे करण्यात आलेल्या तक्रारीत तथ्य असल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत, आर्थिक लाभाचा आदेश अर्जदारचे हक्कात करता येईल. अर्जदार व जाबदेणार क्र. १ यांचे विवाहसंबंध अदयाप कायम असून, अर्जदारतर्फे दाखल केलेले शेतजमिनीचे ७/१२ उतारे पाहता, सदरच्या जमिनी जरी जाबदेणार क्र. १ याचे वडिलांचे नांवे म्हणजेच जाबदेणार क्र. २ यांचे नांव मालक म्हणून नोंद असले तरी त्यातून जाबदेणार क्र. १ यास कोणतेही उत्पन्न मिळत नाही असे म्हणता येणार नाही.

१८) सदरकामी यातील अर्जदारातर्फे जरी प्रस्तुतच्या अर्जात अर्जदार हिचेकरीता जाबदेणार क्र. १ कडून दरमहा र.रु. १०,०००/– इतक्या रकमेची अंतरिम पोटगी म्हणून अर्जदारातर्फे मागणी केल्याचे दिसून येते. मात्र त्या अनुषंगाने जाबदेणार क्र. १ याचे उत्पन्नाबाबत अर्जदारातर्फे दाखल केलेला कागदोपत्री पुरावा पाहता, सदरची अंतरिम पोटगीची मागणी अवास्तव स्वरुपाची असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे अशा परिस्थितीत वर नमूद वस्तूस्थिती विचारात घेउन अर्जदार हिच्या दैनंदिन गरजा तसेच राहणीमान पाहता, जाबदेणार क्र. १ याने अर्जदार हिस दरमहा र.रु. ३,०००/– या दराने प्रस्तुत अर्ज दाखल तारखेपासून अंतरिम पोटगीची रक्कम मूळ अर्जाचा निकाल होईपर्यंत देण्याचा आदेश करणे न्यायोचित होईल. सबब, अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजूर होणेस पात्र असल्याचे निष्कर्षाप्रत येउन खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

(१) अर्जदार हिचा नि.क्र. ५ वरील अर्ज अंशतः मंजूर करणेत येतो.

(२) जाबदेणार क्र. १ याने अर्जदार हिस अर्ज दाखल तारखेपासून दरमहा र.रु. ३,०००/- (अक्षरी रुपये तीन हजार मात्र) अंतरिम पोटगी म्हणून मुळ अर्जाचा निकाल होईपर्यंत नियमितपणे दयावी.

(३) आदेशाची प्रत संरक्षण अधिकारी, अर्जदार व जाबदेणार यांना विनामूल्य देण्यात यावी.

(सदरचा आदेश खुल्या न्यायालयात जाहीर करणेत आला.)

दिनांक – २१/०७/२०२३

(पी.व्ही. सपकाळ)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
जुन्नर, जि. पुणे

**शेरा**

मी शपथेवर सांगतो की, आदेशातील मूळ मजकूर व पी.डी.एफ. मधील मजकूर शब्द—न—शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नांव | : | पी.व्ही.सपकाळ<br>दिवाणी न्यायाधीश व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, जुन्नर |
| लघुलेखकाचे नांव | : | योगेश के. कोटस्थाने |
| निकाल तारीख | : | २१/०७/२०२३ |
| पिठासीन अधिका—याने आदेशपत्रावर सही केलेचा दिनांक | : | २१/०७/२०२३ |
| आदेश/निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | : | २४/०७/२०२३ |